MHAH230002632004

## नियमित दिवाणी दावा क्र. २१५/२००४ मधील नि. ३०६ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुत दावा हा त्यांनी सरस निरस मानाने वाटप कब्जासाठी, निरंतर ताकीदीचे मनाई हुकुमासाठी व इतर मागण्यांसाठी दाखल केला आहे. वादी क्र. ३ बाबुसिंग जयसिंग परदेशी हे दि. १४/०५/२०११ रोजी मरण पावले आहेत. परंतु कायद्याची माहिती नसल्याने त्यांनी वकीलांना मुदतीत वारसांबाबतची माहिती व कागदपत्र पुरविले नाही व त्यामुळे वादी क्र.३ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणता आलेले नाहीत. प्रतिवादीचे कथनानुसार, अर्ज खरा व बरोबर नसुन संयुक्तिक नाही. करीता अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी क्र. ३ हे दि. १४/०५/२०११ रोजी मयत झाले आहेत. दावा अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. दाव्यातील पक्षकार हे वयोवृध्द आहेत. प्रस्तुतचा दावा जाहिर ठराव, वाटप व निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे वादी क्र. ३ चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने वादी क्र.३ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज नि. ३०६ प्रतिवादींना रक्कम रु.५००/–(रक्कम रूपये पाचशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची पुर्तता झाल्यानंतर मयत वादी क्र.३ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करण्यात येईल.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2024.07.12 14:54:02 +0530

श्रीगोंदा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

दिनांक १०/०७/२०२४. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.